**MHKO100000342023**

**निशाणी क्र. ५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज, अर्जदार यांनी रक्कम रुपये ५,०००/- दरमहा प्रत्येकी अंतरिम पोटगी मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

**२.** अर्ज व निशाणी क्र. ९ वर दाखल केलेले म्हणणे वाचले. अर्जदार हिने निशाणी क्र. १२ वर दाखल केलेले उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र/घोषणापत्र तसेच वि.प. याने निशाणी क्र. १३ वर दाखल केलेले उत्पन्ननाबाबतचे प्रतिज्ञापत्र/घोषणापत्र पाहीले. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला.

**३.** मुळ अर्ज व निशाणी क्र. ५ च्या अर्जामध्ये अर्जदार क्र. १ चे वि.प. बरोबर हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे दिनांक ३१/०३/२००८ रोजी मौजे कडगांव, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथे विवाह झाला असे कथन आहे. सदर विवाह संबंधातून अर्जदार क्र. २ स्वयंम व अर्जदार क्र. ३ सिध्दार्थ अशी दोन अपत्ये झाली. वि.प.हे टी.व्ही. रिपेअरीचा व्यवसाय करतात. अर्जदार यांनी अर्जामध्ये वि.प. यांनी केलेल्या शारीरिक व मानसिक छळाबाबत व वि.प. यांनी दिनांक २५/०४/२०२२ रोजी अर्जदार यांना त्यांचे मुलासह अंगावरील कपडयानिशी घरातून जबरदस्तीने हाकलून लावल्याचे कथन केले आहे. अर्जदार हे आता अर्जदारचे माहेरची परिस्थिती चांगली नसलेने व उत्पन्नाचे कोणतेही साधन नसलेने उपासमार होत आहे. याउलट, वि.प. यांचे सांपत्तीक परिस्थिती चांगली असून वि.प. हा टी.व्ही. रिपेअरीचे कामातून दरमहा रुपये १,५०,०००/- उत्पन्न मिळते. तसेच वि.प.ची मौजे कडगांव येथे ५ एकर जमीन असून त्यातून वार्षिक ३ ते ४ लाखाचे उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी दरमहा रुपये ५,०००/- इतकी पोटगी देणेची विनंती केली आहे.

**४.** वि.प. यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे निशाणी क्र. ९ वर दाखल करुन अर्जातील मजकुर नाकारला आहे. वि.प. यांनी अर्जदार यांचेशी असलेले नाते संबंध नाकारले नाही. अर्जदार ही दिनांक २५/०४/२०२२ पासून त्यांच्या आत्या श्रीमती लता दिलीप शिंदे रा. संकेश्वर यांचेकडे राहत असल्याचे तिच्या कथनावरुन दिसते. तेंव्हापासून वि.प. यांनी अर्जदारांच्या पालणपोषणाकरीता व दैनंदिन खर्चाकरीता तरतुद केलेली दिसत नाही. वि.प. यांनी निशाणी क्र. १३ च्या शपथपत्रात दिलेल्या विवरणावरुन असे दिसते की, ते टी.व्ही. दुरुस्तीचा व्यवसाय करतात. अर्जदार यांना आजमितीस उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसत नाही. अर्जदार ही सध्या अर्जदार क्र. २ स्वयंम व अर्जदार क्र. ३ सिध्दार्थ यांचेसोबत राहत आहे. वि.प. यांनी अर्जदार क्र. १ ते ३ हे त्यांचेपासून वेगळे राहत असलेपासून त्यांना आर्थिक सुविधा पुरवित असलेबाबत कुठेही कथन केले नाही. अर्जदार व वि.प. यांनी परस्पर विरोधी केलेल्या तक्रारी ह्या पुराव्याअंती निर्णित कराव्या लागतील व त्याबाबत या स्टेजला कोणतेही निष्कर्ष काढता येणार नाही. अर्जदार यांचे अर्जातील कथनावरुन अर्जदार यांच्या बाबतीत कौटूंबिक हिंसाचार झाला आहे असे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे पती या नात्याने पत्नीचे व मुलांचे पालनपोषण करणे ही नैतिक व वैयक्तीक जबाबदारी वि.प. यांची आहे. आजच्या घडीला जिवनावश्यक वस्तुंचे भाव विचारात घेता व वि.प. यांचे उत्पन्न व अर्जदार यांच्या सध्याच्या गरजा लक्षात घेता अर्जदार क्र. १ ते ३ यांना एकत्रात रुपये ५०००/- दरमहा अंतरिम पोटगी मंजूर करणे न्यायोचीत वाटत आहे. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

**२.** वि.प. यांनी अर्जदार क्र. १ ते ३ यांना अंतरिम पोटगी म्हणून एकत्रात रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) दरमहा ही अर्ज दाखल तारखेपासून या प्रकरणाच्या अंतिम निर्णयापर्यंत दयावेत.

**३.** उभय पक्षकारांना या आदेशाची प्रत मोफत देणेत यावी.

DHANASHRI MAHADEV PAWAR
Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.07.31 17:18:22 +0530

ठिकाण गडहिंग्लज
दिनांकः- २८/०७/२०२३.

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
गडहिंग्लज